Research Dimension

ISSN: 2249-3867 Impact Factor: 5.1899(UIF)

# The Shendurni Secondary Education Co-op. Society's Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College, SHENDURNI, Tal. Jamner, Dist. Jalgaon, Maharashtra, India

Sponsored by
North Maharashtra University, Jalgaon

## NATIONAL MULTI DISCIPLINARY CONFERENCE

on

# "DIGITAL PAYMENT SYSTEM AND RURAL INDIA"

7th October, 2017

UGC APPROVED



Venue

Department of Commerce

Appasaheb R. B. Garud Arts, Commerce & Science College, Shendurni

Scanned with CamScanner


| | | |
|---|---|---|
| 17 | कॅशलेस(रोकडविरहीत) अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्र<br>प्रा.वसंत नानाराव पतंगे , प्रा. डॉ. शिवाजी पाते | 78 |
| 18 | नोटाबंदी आणि अंकात्मक देयक प्रणाली<br>**Prof. Vinayak Ramchandra Wasalkar** | 83 |
| 19 | रोकड विरहीत व्यवहार व कृषी अर्थव्यवस्था<br>*डॉ. संजय पी. पाटील , प्रा. योगेश धुलाल भामरे* | 87 |
| 20 | डिजीटल पेमेंट पध्दती : सर्वसामान्य दृष्टीकोन<br>*प्रा.सुरेश दगडु पाटील* | 90 |
| 21 | डिजिटल पेमेंट सिस्टीम : यश-अपयश व भारतीय जनता आणि राजकीय विश्लेषण<br>प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे | 96 |
| 22 | डिजिटल पेमेंट : वास्तविकता आणि आव्हाणे<br>डॉ. प्रदीप औजेकर | 99 |
| 23 | डिजिटल इंडिया?<br>प्रा. सतीश दत्तात्रय पाटील | 102 |
| 24 | ग्रामीण भागातील ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर रोकडविरहित व्यवहारांचा झालेला<br>परिणाम- एक अभ्यास<br>प्रा.योगिता पांडुरंग चौधरी | 104 |
| 25 | नकदी रहित आहरण<br>*प्रा. डॉ. गजानन वानखेडे , प्रा. कोमलकुमार परदेशी* | 108 |


Scanned with CamScanner

ISSN 2349-3887 IMPACT FACTOR : 5.1899(UIF)

RESEARCH DIMENSIONS

# डिजिटल पेमेंट सिस्टीम : यश-अपयश व भारतीय जनता आणि राजकीय विश्लेषण



प्रा.डॉ. संजय ज्ञानदेवराव भोळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आ.र.भा.गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी

## प्रस्तावना -

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हि लोकशाहीची खरी आधारभूत सूत्रे आहेत. या आधाराद्वारे भारतातील सर्वसामान्य जनतेच्या विकासाचा विचार करण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये जी आर्थिक विषमतेची दरी होती ती दरी मिटविण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये आर्थिक अधिकार हा कायदेशीर अधिकार असेल अशी तरतूद १९७८ च्या ४४ व्या घटना दुरुस्तीनुसार करण्यात येऊन आर्थिक नियंत्रण प्रस्थापित करणारी अर्थव्यवस्था निर्माण करण्यात आली. असे असले तरी भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये एकीकडे भांडवलदाराचे वर्चस्व व दुसरीकडे समाजवादी विचार असी वैचारिक विसंगती मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आणि त्याचाच परिणाम म्हणून आर्थिक विषमतेची मोठी दरी आज भारतामध्ये निर्माण होताना दिसत आहे.

भारतामध्ये आज मोठमोठे भांडवलदार लोक आपल्या भांडवलाच्या जोरावर सर्वसामान्य लोकांची पिळवणूक करतात तर दुसरीकडे लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या गोंडस नावाखाली भ्रष्ट राजकीय व्यवस्था आर्थिक भ्रष्टाचाराच्या माध्यमातून जनतेची प्रचंड लूट करत आहे अशा आर्थिक विषमतेच्या खाईत सापडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला व राज्यव्यवस्थेला नियंत्रित करण्यासाठी भारताचे विद्यमान पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी ८ डिसेंबर २०१६ रोजी ५०० व १००० च्या नोटांवर बंदी आणून भारताच्या आर्थिक व राजकीय व्यवस्थेला मोठा धक्का दिला आणि भारतातील बडया-बडया आर्थिक उलाढाली करणाऱ्या यंत्रणेला व भ्रष्टपद्धतीने जमा केलेल्या भांडवलदाराला मोठी चपराक बसली आणि येथून पुढे डिजिटल पेमेंट व्यवस्थेला चालना मिळाली आणि आज बऱ्याच प्रमाणात या व्यवस्थेने आपला वेग घेतलेला आहे.

असे असले तरी भारतातील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने मात्र डिजिटल पेमेंट व्यवस्थेचा सामान्य पातळीवर येऊन विचार करणे आता खऱ्याअर्थाने काळाची गरज झाली आहे.

## डिजिटल पेमेंट सिस्टीम वास्तवता -

भारतातील सर्वसामान्य जनतेच्या विचार केला तर आपणास सरपक्क पणे दिसून येते की, डिजिटल पेमेंट सिस्टिम ही सर्वसामान्यांच्या दृष्टीने बऱ्याचअंशी अडचणीची झाली आहे. देशपातळीवर त्याचा फायदा होत असताना मात्र बडया आर्थिक स्तरावरील घटकांना आपआपली आर्थिक घडी व्यवस्थित बसवली, त्यांच्यावर आर्थिक नियंत्रणाचा फारसा परिणाम पण झाला नाही. मात्र अल्प आर्थिक स्तरावर जीवन जगणारा वर्ग मात्र या व्यवस्थेचा कचाट्यात सापडलेला आहे. याचाही विचार करणे आज क्रमप्राप्त आहे.

डिजिटल पेमेंट सिस्टीमच्या तांत्रिक व्यवहारातून आजही सर्वसामान्य जनता सावरलेली नाही. सरळ व सुलभ आर्थिक व्यवहारासाठी सर्वसामान्य जनता बऱ्याचअंशी अडचणीत येत आहे. या सर्व बाबींचा परिणाम आर्थिक उलाढालीवर होऊन

व्यावसायिक व मध्यमवर्गीय उद्योग पातळीवर आज मंदीची लाट आलेली आपणास दिसून आहे. याचा परिणाम वैचारिकदृष्ट्या विचार केल्यानंतर राजकीय व्यवस्थेवर भविष्यात नकारात्मक किंवा निगेटिव्ह पद्धतीने झाल्याशिवाय राहणार नाही कारण ७०% जनता खेडेगावात राहते. त्या जनतेला सुलभ पद्धतीने जीवन आवश्यक असते. ते आपणास मिळताना दिसत नाही.

डिजिटल पेमेंट सिस्टीम यश, अपयश / फायदे, तोटे -

डिजिटल पेमेंट सिस्टीम किंवा कॅशलेस सिस्टीम ती आजच्या भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता काही अंशी फायद्याची आहे आणि काही अंशी त्यामध्ये दोष हि दिसतात परंतु भविष्य काळात यामुळे जर काही समस्या सातत्याने निर्माण होत गेल्या तर यामध्ये योग्य तो बदल करणे काळाची गरज राहील.

आज भारतात तमिळनाडू मधील ओरोविले हे शहर पहिले कॅशलेस शहर म्हणून ओळखले जाते या शहरात ५० हजार लोक राहतात. यामध्ये ४५ देशातील लोक राहतात ज्यामध्ये भारतातील ३०% लोक समाविष्ट आहे.

भारतातील दुसरे कॅशलेस शहर गुजरात मधील आकोदेरा गाव आहे. ज्या गावामध्ये १२०० लोक वस्ती आहे. जीथे सिगारेट पासून चहा पर्यंत सर्व पेमेंट मोबाईल द्वारे केले जात आहे. आणि यानंतर गोवा राज्याची कॅशलेस व्यवस्तेकडे वाटचाल सुरु आहे.

असे असले तरी देशपातळीवर जेव्हा आपण विचार करू तेव्हा मात्र यामध्ये व्यापकता दिसत नाही.

डिजिटल पेमेंट सिस्टीम फायदे / लाभ :-

१. **भ्रष्टाचाराला आळा बसेल** :- डिजिटल पेमेंट व्यवस्थेमुळे सर्वप्रकारचे आर्थिक व्यवहार पारदर्शी व व्यवहाराची नोंद राहिल्यामुळे भ्रष्टाचाराला बऱ्याच प्रमाणात आळा बसेल.

२. **चलन छपाईसाठी लागणारी आर्थिक बोझा कमी होईल**:- यामुळे भारतीय रिजर्व बँकेला नोटा छापण्यासाठी लागणारा आर्थिक खर्च हा होणार नाही कारण नोटांचा कागद परकीय देशातून आयात करावा लागतो, दरवर्षी फाटणाऱ्या नोटा छापव्या लागतात यासाठी आर्थिक खर्च करावा लागतो तो होणार नाही.

३. **वस्तू खरेदीसाठी जादा किंमत द्यावी लागणार नाही** :- ग्राहकांसाठी लागणारी वस्तू जेव्हा व्यापारी विकतील तेव्हा ती केवढ्याला विकल्या जात आहे यावर सरकारचे लक्ष असेल, त्यामुळे तिचे दर ग्राहकांना परवडणारे राहतील.

४. **आयकर सरकारला व्यवस्थित मिळेल** :- या व्यवस्थेमुळे कोणत्याही प्रकारचा आयकराची लपवणूक होणार नाही. कारण डिजिटल पेमेंट सिस्टीम हि पारदर्शी असल्यामुळे व्यवहारामध्ये सर्व आर्थिक व्यवहाराची शासकीय पातळीवर नोंद राहील.

५. **बँकाजवळ अधिक चलन राहील** :- डिजिटल पेमेंट सिस्टीममुळे आर्थिक मर्यादा व्यवहारावर आल्यामुळे बँकाजवळील पैसा हा ज्यादा बाहेर न जाता भांडवली स्वरुपात तो बँकांना वापरावयास मिळेल.

६. **दहशतवाद आणि आतंकवाद होणारा चलन पुरवठा कमी होईल** :- डिजिटल पेमेंट सिस्टीम हि पारदर्शी आर्थिक व्यवहार पद्धती असल्यामुळे पूर्वी दहशतवादी टोळ्यांना आर्थिक पुरवठा करणाऱ्या संघटनावर होत्या त्यांना आता खिळ बसेल व त्यातून भारतीय राजकीय व्यवस्था सुरक्षित राहीळ.

७. **ई - कॉमर्स व्यवस्थेला गती येईल** :- डिजिटल पेमेंट व्यवस्थेमुळे ई - कॉमर्स व्यवस्थेला चालना मिळेल व त्यामुळे व्यवहारामध्ये पारदर्शीपणा व व्यावहारिक अचूकता व गतीशीलता महत्व आले आहे. त्यांचा स्विकार करणे आवश्यक आहे.

८. **आर्थिक व्यवहारातील दलालांना खीळ बसेल** :- आर्थिक भ्रष्टाचार करण्यामध्ये सर्वात जास्त सहभाग दलाल लोकांचा असतो. कारण शासकीय पातळीवर दलाल लोक पैसे घेऊन काम करतात ते या व्यवहारामुळे आता बंद होईल.

असे प्रकारचे डिजिटल पेमेंट व्यवस्थेचे भारतीय अर्थव्यवस्थेला व राजव्यवस्थेला काही फायदे किंवा लाभ असले तरी सर्वसामान्य पातळीवर याचा विचार करता काही तोटे सुद्धा आपणास जाणवतात. त्याचाही विचार करणे गरजेचे आहे.

**कॅशलेस सिस्टिमचे तोटे** :-

१. तंत्रज्ञानाच्या मर्यादा व तंत्रज्ञानावर अधिक अवलंबन -

Scanned with CamScanner

डिजिटल पेमेंट हि व्यवस्था बहुतांशी तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे सर्वच ठिकाणी तंत्रज्ञान किंवा इंटरनेट सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध होणार नाही त्यामुळे गरीब लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचण होईल.

२. अज्ञानी किंवा निरक्षर लोक कॅशलेस होऊ शकत नाहीत -

निरक्षर किंवा अज्ञानी लोक तंत्रज्ञानापासून कोसो दूर असतात. त्यामुळे त्यांना या बाबतीत रुची वाटत नाही, तर त्यांना याबाबत उदासीनता वाटते व त्यांचा रोष सरकारवर राहतो. त्याचा हि तोटा कोणत्याही राज्यातील सरकारला होऊ शकतो.

३. आर्थिक दृष्ट्या सक्षम बँकांचा मनमानी कारभार होईल -

डिजिटल किंवा कॅशलेस व्यवस्थेमुळे ज्या बँका आर्थिक दृष्ट्या संक्षम किंवा ज्यांच्याकडे अधिक अर्थ पुरवठा आहे अशा बँकांचा कारभार हा मनमानी होऊन सर्वसामान्य लोकांचा त्यामध्ये विचार होणार नाही.

४. ग्राहकावर मर्यादेपेक्षा अधिक नियंत्रण राहील -

डिजिटल व्यवस्थेमुळे एका अर्थाने ग्राहकहित धोक्यात आले आहे असे चित्र दिसते कारण जे लोक काही सेवा घेऊ इच्छितात त्यांच्यावर शासनाचे अधिक लक्ष राहत असल्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्याचा खऱ्या उपभोग घेता येत नसल्याचे स्पष्टपणे दिसते.

५. सायबर क्राईमला चालना मिळत आहे -

कॅशलेस व्यवस्थेमुळे इंटरनेट किंवा क्रेडीट व डेबिट कार्डच्या आधारावर आर्थिक व्यवहार होतात. वस्तूंची खरेदी व विक्री सुद्धा त्याच पद्धतीने होते अशावेळी ग्राहकाचा वैयक्तिक सेवाकार्ड कोड चोरीस जाऊन त्याचे आर्थिक नुकसान होते हा या पद्धतीचा धोका सर्वसामान्य लोकांना अधिक होतो.

६. बाजार व्यवस्थेवर मंदीची लाट -

कॅशलेस व्यवहारामुळे बाजारपेठांमध्ये आज मोठ्या प्रमाणात मंदीची लाट आली आहे लोकांकडे पैसा नगद स्वरुपात येत नसल्यामुळे व अज्ञांनी लोकांना तंत्रज्ञानाची माहिती नसल्यामुळे बाजारपेठातील खरेदी विक्री यावर मर्यादा येऊन बाजारपेठा मंद गतीने चालत आहेत.

निष्कर्ष :-

एकंदरीतच डिजिटल पेमेंट सिस्टीमचा व्यावहारिक व लोकशाहीच्या पातळीवर वास्तव विचार करता असे दिसून येते कि भारतीय लोकशाही हि कल्याणकारी संकल्पनेवर आधारित असल्यामुळे लोककल्यानाचा विचार करता डिजिटल पेमेंट सिस्टीम हि सर्वसामान्य जनतेसाठी डोकेदुखी झाली आहे कारण जेव्हा व्यावहारिक पातळीवर लोकांना अनेक समस्या येतात तेव्हा कोणतीही नवी व्यवस्था फार काळ टिकून राहत नाही तर तिचे दुष्परिणाम समाज व राज्यव्यवस्थेवर होतात. कारण लोकांना तांत्रिक व्यवस्थेपेक्षा सरळसेवा हि गरजेची वाटते त्या अनुषंगाने भविष्यात याचा विचार होतो काळाची खरी गरज आहे.

संदर्भ –

1)www.bbc.com 20 jan.2017
2)www.jagarjosh.com dec.2016
3)www.outlook hindi.com

Scanned with CamScanner

## Chief Patron

Hon'ble
Shri Dadasaheb Sanjayrao Bhaskarrao Garud
Chairman
The Shendurni Secondary Education Coop Society Ltd. Shendurni

Hon'ble,
Prof (Dr.) P. P. Patil
Vice Chancellor
North Maharashtra University, Jalgaon

## Patron

Hon'ble
Shri. Sagarmalji M. Jain
Secretary,

Hon'ble
Shri. Dipak K. Garud
Joint Secretary

The Shendurni Secondary Education Coop Society Ltd. Shendurni
And
Hon'ble Shri. Uttamrao R. Thorat (Social Worker)
Member, College Development Committee

## Organizer

Principal Dr. Vasudeo R. Patil

Prof. N. S. Sawale,
Vice Principal & Head,
Department of English

Dr. Sanjay W. Bhole
(Head, Dept. of Political Science)

## Organizing Secretary

Dr. Shyam J. Salunkhe
Head, Faculty of Commerce

## Convenor

Prof. (Mrs.) Sujata C. Patil
Head, Dept of Computer Management

Prof. Vasant N. Patange
Head, Dept of Banking & Finance

## Coordinator

Mr. Amar V. Jawale
(Head, Dept. of Economics)

Smt. Yogita P. Chaudhari
(Head, Dept of A/c & Costing)

Dr. Rohidas D. Gaware
(Assistant Professor, Hindi)

## Conference Secretary

Dr. Prashant S. Deshmukh
(Head, Dept. of History)

Mr. Bhushan D. Patil
(Asst. Professor, Marathi)

Mr. Dinesh P. Patil
(Asst. Professor, English)

## National Advisory Committee

Prof. (Dr) Shirishji Kulkarni
Vice Chancellor, Sardar Patel University, Vallabh Vidyanagar (Gujrat)

Dr. Ashokkumar Mishra, Bhilai
Dr. Amandeep Singh, Patiala
Dr. Mukrram Khan, Nadiad
Principal, Dr. P. R. Chaudhari, Fizpur
Dr. Sameer Narkhede, Jalgaon
Dr. Anoopkumar Singh, Lucknow

Dr. (Mrs) Minakshi V. Waykole
Principal P. O. Nahata College, Bhusaval

Prof (Dr) Bimal Jaiswal, Lucknow
Dr. Leena Painter, Surat
Dr. Deepa, Chennai
Prof. (Dr) P. T. Chaudhari, Jalgaon
Prof. (Dr) A. N. Chaudhari, Bhusaval
Dr. BhuvanaVyankatraman, Bhilai

## Organizing Committee

Mr. Mahesh R. Patil
Mr. Ajinath N. Jivrag
Mr. Dhamma H. Dhargave
Prof. Sanjay Y. Patil
Mr. Appa S. Mahajan
Mr. Pramod J. Sona wane
Smt. Reena B. Patil
Smt. Varsha R. Lokhande
Mr. Sandip Kumbhar
Mr. Dipak Patil Mr.

Mr. Satish K. Baviskar
Mr. Hitendrakumar R. Garud
Mrs. Nirupama B. Wankhede
Mr. Sandip E. Drakshe
Mr. Sharad B. Patil
Mr. Nilesh P. Bari
Mr. Rajendrasingh G. Patil
Mr. Shrawan G. Deharkar
Mr. Dipak B. Shirsath
Ramchand ra G. Patil

Mrs. Chhaya Patil

LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur
Ph.: 0217-2372010 / +91-9595-359-435
Email.: apiguide2014@gmail.com
ayisrj2011@gmail.com
Website.: lbp.world

Scanned with CamScanner